PARLE **MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE **MAHOTSAV**

<u>कृपया प्रसिध्दीसाठी</u>

# क्रिडापटूंनी महिलांच्या संरक्षणासाठी पुढे यावे- नगरसेविका सौ.ज्योती अळवणी

मुंबई दि.३०: महिलांना गुंडापासून व विकृत मनोवृत्तीच्या व्यक्तींकडून संरक्षण मिळेल यावर केवळ अवलंबून न राहता समाजाने यासाठी प्रयत्न करावे लागतील. क्रीडापटू हे संघटीत असतात व त्यांची शारिरीक क्षमताही असल्याने त्यांनी यामध्ये पुढाकार घ्यावा अशी विनंती नगरसेविका सौ.ज्योती अळवणी यांनी केली. पार्ले महोत्सवामधील कबड्डी, क्रिकेट, बॉक्सींग, थ्रो बॉल, वॉली बॉल स्पर्धांच्या अंतिम फेरी मध्ये सर्व सामने थांबवून खेळाडू तसेच स्टेडियममध्ये उपस्थित सुमारे ५ हजार क्रिडारसिकांनी दिल्लीमधील बलात्कार पिडीत तरुणीला दोन मिनीटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पीत केली. या प्रसंगी भारतीय स्त्री शक्तीच्या अध्यक्षा स्नेहा पंडित व वर्षा पवार-तावडे यांनी उपस्थीतांना संबोधीत केले.

१३ व्या पार्ले महोत्सवाच्या ७ व्या दिवशी बॅटमिंटन, कबड्डी, क्रिकेट, रायफल शुटींग, वॉली बॉल, थ्रो-बॉल, बॉक्सिंग स्पर्धांच्या अंतिम फेऱ्या झाल्या. या स्पर्धांमध्ये एकूण ३०० हून अधिक बक्षिसे बहाल करण्यात आली. या प्रसंगी कर्नल शैलेश रायकर, ले.कर्नल अविनाश रायकर, रिचा रीएलटर्सचे दिनेश साळवी, मॅक्डोनालचे नितीन पांडे, रोमन विशनचे भूपेंद्रभाई छेडा, महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे जीतेंद्र रावडे, बॅटमिंटन संघटनेचे विश्वजित भटनागर इत्यादी मान्यवर उपस्थीत होते. १३ वर्षे पार्ले महोत्सवाच्या मध्यमातून ४० स्पर्धांमधून हजारो कलावंत व क्रिडापटूंचा महामेळावा आयोजीत करणाऱ्या ॲड. पराग अळवणी यांचे अभिनंदन बक्षिस सभारंभा प्रसंगी उपस्थित शिवसेनेचे आमदार अनिल परब यांनी केले. पार्ले महोत्सवामध्ये रेकॉर्ड डान्स, समूह नृत्य, कॅरम, बुध्दीबळ, वक्तृत्व, एकपात्री प्रयोग स्पर्धा घेण्यात आल्या.

पार्ले महोत्सवामधील रेकॉर्ड डान्स, समूह नृत्य, कॅरम, बुध्दीबळ, वक्तृत्व, एकपात्री प्रयोग स्पर्धा घेण्यात आल्या. सर्वच स्पर्धांमध्ये उस्फूर्त प्रतिसाद देत लहान बालंकासह तरुण-तरुणी पासून जेष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. कॅरम स्पर्धेतील दत्तप्रसाद पालेकर या विशेष मुलांने सर्वांचे लक्ष वेधले तर वयाची पंचातरी पूर्ण केलेले भास्कर व हंसा मेहता या जेष्ठ जोडप्याने आपल्या नृत्याने सर्वांना थक्क केले. अनुराग राज्याध्यक्षाने स्वातंत्र्यवीर सावरकरांवर वक्तृत्व स्पर्धेत मांडलेले विचार सर्वांना प्रेरित करुन गेले तर मनमीत पेम याने आपल्या एकपात्री प्रयोगाने सर्वांना मोहून टाकले. एकूणच पार्ले महोत्सवातील वाढत्या स्पर्धकांच्या संख्येबरोबरच त्यांच्यातील कतृत्वाचाही आस्वाद प्रेक्षकांना लाभला.

---

सदर पत्रक श्री.चरणजीत सिंग संधू, सहआयोजक पार्ले महोत्सव यांनी प्रसिध्द केले आहे.